आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

११ मार्च २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- नागरिकत्व सुधारणा कायदा लागू करणारी अधिसूचना केंद्र सरकारकडून जारी
- मुंबईत ३०० एकर जागेवर जागतिक दर्जाचं थीम पार्क उभारायला, तसंच राज्याच्या तृतीयपंथीविषयक धोरणाला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी
- निवडणूक रोखे विक्रीची माहिती उद्यापर्यंत निवडणूक आयोगाला देण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे स्टेट बँक ऑफ इंडियाला निर्देश
- मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकांत ६१७ अंकांची घसरण

**आणि**

- रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत मुंबईत सुरु असलेल्या अंतिम सामन्यात मुंबईची विदर्भावर २६० धावांची आघाडी

**<><><><><>**

नागरिकत्व सुधारणा कायदा देशात लागू करणारी अधिसूचना केंद्र सरकारनं आज जारी केली. डिसेंबर २०१९ मधे हा कायदा संसदेत मंजूर करण्यात आला होता. त्यानंतर राष्ट्रपतींनी त्याला मान्यता दिली होती. या कायद्यानुसार अफगाणिस्तान, पाकिस्तान, बांगलादेश या देशांमधून आलेल्या अल्पसंख्याक शरणार्थींना भारताचं नागरिकत्व मिळू शकेल. या देशांमधल्या हिंदू, शीख, बौद्ध, जैन, ख्रिस्ती, आणि पारशी धर्मीय शरणार्थींना या कायद्याचा लाभ मिळेल.

**<><><><><>**

दक्षिण मुंबईत महालक्ष्मी रेसकोर्सच्या ३०० एकर जागेवर जागतिक दर्जाचं थीम पार्क उभारण्याच्या प्रस्तावाला राज्य मंत्रिमंडळानं मंजूरी दिली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबईत झालेल्या बैठकीत राज्याच्या तृतीयपंथीविषयक धोरणालाही मंजुरी मिळाली. यापुढं सरकारी कागदपत्रांवर वडिलांबरोबर आईचंही नाव बंधनकारक करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. बीडीडी गाळेधारक आणि झोपडीधारकांच्या करारनाम्यावरचं मुद्रांक शुल्क कमी करण्याचा निर्णयही आज घेण्यात आला. तसंच मुंबईत पायाभूत सुविधांच्या विकासासाठी केएफडब्ल्यूकडून ८५० कोटी अर्थसहाय्य घ्यायलाही आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. एमएमआरडीएच्या प्रकल्पांसाठी २४ हजार कोटीची शासन हमी देण्यालाही मंजुरी देण्यात आली.

<><><><><>

निवडणूक रोखे विक्रीची माहिती देण्यासाठी येत्या ३० जूनपर्यंत मुदत मागणारा स्टेट बँक ऑफ इंडियाचा अर्ज सर्वोच्च न्यायालयानं फेटाळला आहे. निवडणूक रोखेविषयक माहिती उद्या कामकाज बंद होण्याच्या वेळेपर्यंत निवडणूक आयोगाला द्यावी, असे निर्देश सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालच्या पाच सदस्यीय पीठानं दिले आहेत. निवडणूक आयोगानं ही माहिती परवा संध्याकाळी ५ वाजेपर्यंत संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी, असे निर्देशही न्यायालयानं दिले.

सर्वोच्च न्यायालयानं १५ फेब्रुवारीला, निवडणूक कर्जरोखे योजना रद्द केली. त्यावेळीच या योजनेतून दिल्या गेलेल्या देणग्यांचे तपशील १३ मार्चपर्यंत जाहीर करण्याचे निर्देश न्यायालयानं निवडणूक आयोगाला दिले होते.

<><><><><>

मालवाहतुकीसाठी समर्पित दोन महामार्गांचं लोकार्पण प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्या होणार आहे. समर्पित मालवाहतूक रस्ते महामंडळाचे संचालक शोभित भटनागर यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. यात गुजरातमधे मकरापूर इथून महाराष्ट्रात घोलवडपर्यंत येणाऱ्या रस्त्याचा समावेश आहे.

**<><><><><>**

मुंबई सागरी किनारा मार्गावरच्या वरळी ते मरीन ड्राइव या मार्गिकेचं आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन झालं. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि अजित पवार उपस्थित होते. उद्यापासून सोमवार ते शुक्रवार सकाळी ८ ते रात्री ८ या वेळेत सामान्य वाहतुकीसाठी हा रस्ता खुला होईल.

**<><><><><>**

नवमतदारांसाठी मेरा पहला वोट देश के लिए हे मतदार जागरूकता अभियान सुरू आहे. निवडणूक हा लोकशाहीचा उत्सव असतो. यावेळी पहिल्यांदा मतदान करणार असलेल्या नवमतदारांनी या लोकशाहीच्या उत्सवामध्ये सहभागी होऊन आपला मतदानाचा हक्क बजावावा, असं आवाहन अभिनेते दीपक करंजीकर यांनी केलं आहे.

**होल्ड बाईट...दीपक करंजीकर**

**<><><><><>**

देशांतर्गत शेअर बाजारांमधे आज गुंतवणूकदारांनी विक्रीवर भर दिला. त्यामुळे मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकांत ६१७ अंकांची घसरण झाली आणि तो

७३ हजार ५०३ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १६१ अंकांची घसरण नोंदवत २२ हजार ३३३ अंकांवर बंद झाला.

विशेषतः धातू आणि बँकिंग क्षेत्रातल्या कंपन्यांच्या समभागांची आज मोठी घसरण झाली.

**<><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत मुंबईत सुरु असलेल्या अंतिम सामन्यात आज दुसऱ्या दिवशी मुंबईनं विदर्भावर २६० धावांची आघाडी घेतली. पहिल्या डावात २२४ धावा करणाऱ्या मुंबईनं आज विदर्भाचा पहिला डाव १०५ धावात गुंडाळला. त्यामुळे पहिल्या डावात मुंबईला ११९ धावांची आघाडी मिळाली. मुंबईतर्फे धवल कुलकर्णी, शम्स मुलानी, आणि तनुष कोटियन यांनी प्रत्येकी तीन बळी घेतले. शार्दुल ठाकूरनं एक गडी बाद केला.

मुंबईच्या दुसऱ्या डावाची सुरुवात खराब झाली. सलामीचा फलंदाज पृथ्वी शॉ ११ धावांवर, तर भूपेन ललवाणी १८ धावांवर बाद झाला. मात्र त्यानंतर मुशीर खान आणि कर्णधार अंजिक्य रहाणे यांनी डाव सावरला. दोघांनीही नाबाद अर्धशतकं केली. आजचा खेळ थांबला तेव्हा मुंबईच्या दोन बाद १४१ धावा झाल्या होत्या. मुशीर खान ५१, तर अंजिक्य रहाणे ५८ धावांवर खेळत होता.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्लीत ‘सशक्त नारी विकसित भारत’ या कार्यक्रमात महिला लाभार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी प्रधानमंत्री मोदी यांनी एक हजार महिलांना ड्रोन सुपूर्द केले, दीनदयाळ अंत्योदय योजनेतील यशस्वी

लखपती दीदी महिलांचा सत्कार केला, तसंच विविध स्वयं सहायता गटांना सुमारे आठ हजार कोटी रुपयांचं कर्ज वितरित केलं. एक लाख कोटी रुपये खर्चाच्या ११२ महामार्ग प्रकल्पांचं लोकार्पण आणि भूमीपूजन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालं. हरयाणात गुरुग्राम इथं आयोजित कार्यक्रमाला केंद्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी उपस्थित होते.

**<><><><><>**

मध्य प्रदेशात, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रातल्या ड्रोन दिदींनी १०२ ड्रोन एकत्र उडवून नवा विक्रम केला. भोपाळमधल्या फांडा इथं नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पल्स रिसर्च सेंटरमध्ये हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सर्व ड्रोन दीदींना भोपाळमध्ये ड्रोन उडवण्याचे प्रशिक्षण देण्यात आलं. या ड्रोन चा वापर ड्रोन दीदी शेतीच्या कामात करणार आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'ड्रोन दीदी' योजनेअंतर्गत या महिलांना ड्रोन उडवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले होते.

**<><><><><>**

मिशन दिव्यास्त्र अंतर्गत अग्नी- पाच या आंतरखंडीय क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी केल्याची माहिती प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात दिली आहे. स्वदेश निर्मित क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी केल्याबद्दल प्रधानमंत्र्यांनी डीआरडीओच्या वैज्ञानिकांचं अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा उद्या नंदूरबार जिल्ह्यातून महाराष्ट्रात प्रवेश करणार आहे. त्यानंतर १३ मार्चला धुळे, मालेगाव, १४ मार्चला नाशिक, १५ मार्चला पालघर, ठाणे असा प्रवास करत ही यात्रा १६ मार्चला मुंबईत दाखल होणार आहे. १७ मार्चला भारत जोडो न्याय यात्रेचा समारोप मुंबईतल्या शिवाजी पार्क मैदानावर होणार आहे. तिथंच इंडिया आघाडीच्या प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराचं रणशिंग फुंकलं जाणार आहे.

**<><><><><>**

जालना जिल्ह्यातल्या भोकरदन तालुक्यात केंद्र सरकारच्या दिव्यांगजन सशक्तीकरण विभागातर्फे लाभार्थ्यांना विविध वस्तूंचं वाटप केंद्रीयमंत्री रावसाहेब दानवे यांच्या आज हस्ते करण्यात आलं.

केंद्र आणि राज्य सरकारच्या दिव्यांगांसाठी विविध योजना असून, त्याचा लाभ घेण्याचं आवाहन दानवे यांनी केलं. यावेळी ३८४ लाभार्थ्यांना तीन चाकी सायकली, श्रवण यंत्र, व्हिलचेअर, छडीचं वाटप केलं.

**<><><><><>**

संपूर्ण राज्यात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात तुलनेत किंचित वाढ झाली आहे. कोकणात काही ठिकाणी किंचित घट झाली आहे. राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान ३९ पूर्णांक ६ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात, राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील, असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**